# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक १०.०७.२०२६ शुक्रवार**

**मा. न्यायालयातुन आरोपीला सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक १०.०७.२०२६ रोजी मा. २९ वे सह दिवाणी न्यायाधीश तथा प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकरी नागपुर, श्री. ए.ए. वाळुजकर साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ४५२६/२००७ मधील पोलीस ठाणे कळमना येथील अप. क्र. ०५/२००७ कलम ३५४ भा.दं.वि. या गुन्ह्यातील आरोपी मुकेश धर्मदास दहाट, वय २८ वर्षे, रा. नविन मंगळवारी, सिध्दार्थ शाळेजवळ, यशोधरानगर, नागपूर याचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ३५४ भा.दं.वि. कायद्यान्वये ०३ महिने सश्रम कारावासाची शिक्षा व १,०००/—रू. दंड आणि दंड न भरल्यास ०१ महिना अतिरीक्त सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक ०३.०१.२००७ चे २०.०० वा चे सुमारास, पोलीस ठाणे कळमना हद्दीत राहणाऱ्या ०७ वर्षीय पिडीता फिर्यादी हिला तिचे काकुने गोडलिंबाचा पाला आणनेकामी वर नमुद आरोपीताचे घरी पाठविले असता, आरोपीने पिडीतेस आरोपीने आपल्या घरामध्ये नेवून, तिचे इच्छेविरूध्द, तिचेसोबत लैंगिक अश्लील चाळे करून फिर्यादी मुलीचा विनयभंग केला. फिर्यादी पिडीता हिने दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक ०३.०१.२००७ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तत्कालीन तपासी अधिकारी सपोनि देवराज पांडे यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्री अस्थेनकर यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री सुनिल गुप्ता यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा. प्रमोद राठोड, मपोहवा हर्षदा चौधरी यांनी काम पाहिले.

**(कामगिरी)**

**१) गुन्हेशाखा भुमाफीया पथक, पो. ठाणे खापरखेडा व कोराडी पोलीसांची संयुक्त कामगिरी :— अवैध हुक्का पार्लर चालकांविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०९.०७.२०२६ चे २३.५५ वा. ते दिनांक १०.०७.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखेचे मा. सहायक पोलीस आयुक्त श्री. शिवप्रसाद पारवे यांना गुप्त बातमीदार मार्फतीने खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत दहेगाव येथील 'हॉटेल बिहाईन्ड द लेक' मध्ये बेकायदेशीर हुक्का पार्लर चालविले जात आहे. अशा खात्रीशीर माहितीवरून सपोआ. यांनी दोन पथके तयार करून, घटनेची सत्यता पडताळणी करून, नमुद ठिकाणी रेड कारवाई केली असता, तेथे आरोपी हॉटल मॅनेजर सोहेल कमरूद्दीन अंसारी वय २६ वर्षे रा. वॉर्ड नां. ०३, वलनी, ता. सावनेर जि. नागपूर हा शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य हुक्का पदार्थ एकुण १९ ग्राहकांना सेवनाकरीता पुरवितांना समक्ष मिळुन आला. आरोपी हा विनापरवाना स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता अवैधरित्या हुक्का पार्लर चालवित असल्याचे निष्पन्न झाले.

आरोपीचे ताब्यातुन हुक्का पार्लरकरीता उपयोगात येणारे साहित्य हुक्का पॉट, वेगवेगळे फ्लेव्हरचे तंबाखु व ईतर साहित्य असा एकुण ३८,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे खापरखेडा येथे कलम २७२, भा.न्या.सं. सहकलम ४, ६, ७, २०, २१, २४ सिगारेट आणि ईतर तंबाखु उत्पादने अधिनीयम २००३ महाराष्ट्र सुधारणा अधिनीयम २०१८ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव खापरखेडा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (अति.कार्य. गुन्हेशाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली, सपोनि. आनंद बिच्छेवार, विनोद जोकार, पोउपनि. आशिष कोहळे, पोहवा. निलेश इंगोले, सुशिल बहिरे, देवेंद्र नवघरे, मुकेश वाघाडे, रंजित राठोड, पोअं. बळीराम भालेकर, मंगेश नरकयर, राजु, संदीप वाघमारे, व चापोअं. सुरज कांबळे असे भुमाफिया विरोधी पथक, पोलीस ठाणे खापरखेडा व कोराडी यांनी संयुक्तीकरित्या केली.






**<u>२) कळमना पोलीसांची कामगीरी :— घरफोडीचा गुन्हा उघडकीस.</u>**

दिनांक ०२.०७.२०२६ चे २१.३० वा. ते दिनांक ०३.०७.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी विक्रम लक्ष्मणदास कुकरेजा वय ४० वर्षे, रा. प्लॉट क्र. ७, बॅक कॉलनी, लाल बंगलो, जरीपटका, नागपूर यांचे पोलीस ठाणे कळमना हद्दीत जुना कामठी रोड, प्लॉट नं. १४, चिखली, देवकरतार स्टील इंडस्ट्रीज नावाचे हार्डवेअरचे दुकान आहे. फिर्यादी व त्यांचे चुलतभाऊ यांनी त्यांचे दुकानाचे शटरला लॉक लाऊन, बंद करुन घरी गेले होते. दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने दुकानाचे मागचे शटर तोडुन, आंत प्रवेश करून, दुकानातील सॅमसंग कंपनीचा मोबाईल, नळाचे फिटींग पार्टस् ३५० नग, चांदीचा शिक्का वजनी ५० ग्राम असा एकूण ६९,५००/—रु. चा मुद्येमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्ह्याचे तपासादरम्यान कळमना पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, गुन्हयात ०५ विधीसंघर्षग्रस्त बालक समाविष्ट असल्याचे निष्पन्न केले. पाचही विधीसंघर्षग्रस्त बालक यांना ताब्यात घेऊन गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, त्यांनी

संगणमताने वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. विधीसंघर्षग्रस्त बालकांचे ताब्यातुन गुन्हयातील चोरी गेलेला संपुर्ण मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रविण काळे, पोउपनि. संतोषकुमार रामलोड, पोहवा. रविकुमार शाहू, प्रदीप पवार, पोअं. मंगेश लोही, संतोष पांडे, अनिल जाधव व प्रफुल्ल गोहोकार यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे कळमणा :— विनयभंग करणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

पोलीस ठाणे कळमणा हद्दीत राहणाऱ्या २७ वर्षीय फिर्यादी यांचा परिचीत आरोपी नामे मिथलेश विरसिंग वरखडे, वय २७ वर्ष रा. भवानी नगर, पारडी, नागपूर याने फिर्यादीस मागील सहा महिन्यापासून वारंवार फोन करुन त्रास दिला. दिनांक ०८.०७.२०२६ चे १९.३० वा. चे सुमारास, आरोपीने फिर्यादी यांचे मोबाईलवर व्हॉटस्अप कॉल केला असता, तो फिर्यादीने उचलला नाही, म्हणून आरोपीने फिर्यादीचे घरी येऊन त्याने फिर्यादीचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. फिर्यादीने बचावासाठी जोराने आवाज केला असता, फिर्यादीचे पती वाचविण्यास आले असता, आरोपीने फिर्यादीचे पतीस शिवीगाळ करुन, हातबुक्कीने मारहाण केली. तसेच, आरोपीने गाडीची चाबी फिर्यादीचे डोक्यावर फेकुन मारल्याने त्या जखमी झाल्या. जखमीचा उपचार मेयो हॉस्पिटल येथे करण्यात आला आहे. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि. निलेश कुलसंगे ९८३४२१९७४१ यांनी आरोपीविरूध्द कलम ७४,३३३,११५(२), ११८(२),३५२,३५१(३) भा.न्या.सं. कायद्यान्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस तात्काळ अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २६.०६.२०२६ चे १६.०० वा. चे सुमारास, फिर्यादी जितेंद्र संतोष दिग्रसकर वय ४२ वर्षे, रा. प्लॉट क्र. ५१, पवार नगर, हुडकेश्वर नगर, नागपूर हे त्यांचे पॅशन मोटर सायकल क्र. एमएच ४० एबी १९०९ ने पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, राजापेठ चौक येथून रस्ता ओलांडत असतांना एका अज्ञात चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मोटारसायकलला धडक मारून, गंभीर दुखापत करून पळुन गेला. जखमी फिर्यादीचा उपचार निरामय हॉस्पीटल येथे करण्यात आला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिनांक ०८.०७.२६ रोजी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. संदीप बोरकर ९४०३६३६३८३ यांनी अज्ञात आरोपी वाहन चालकाविरूध्द कलम २८१, १२५(ब) भा.

न्या.सं., सहकलम १३४, १७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपी वाहन चालकाचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे गणेशपेठ :–** दिनांक १०.०७.२०२६ चे ०४.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत नवभारत गल्ली ते कॉटन मार्केट दरम्यान धिरज गादी भंडार दुकानासमोर एक अनोळखी पुरुष इसम वय अंदाजे ४० ते ४५ वर्ष हे बेशुध्द अवस्थेत मिळून आल्याने, त्यांना पोलीसांनी उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी प्रल्हाद देवराव कुईटे, वय ३४ वर्ष, रा. टेंभुरखेडा, वरुड, जि. अमरावती, ह.मु. चांडक ले–आऊट जवळ, महासागर प्रेस, पुराना नवभारत गल्ली, गणेशपेठ, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे पोउपनि. सोनवणे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे सक्करदरा:–** सौ. वैष्णवी हंसराज गजभिये वय ३५ वर्षे, रा. सोमवारी क्वॉर्टर, गजानन मंदीरजवळ, सक्करदरा, नागपूर ह्या सोबत मुलगा नामे शौर्यदीप हंसराज गजभिये वय दीड वर्ष याचेसह दिनांक ०३.१.२०२५ चे ०९.०० वा. पासून पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीतील राहते घरुन रागाचे भरात कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **सौ. वैष्णवी वर्णन** –रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा– मजबुत, उंची– ५ फुट २ इंच, केस– काळे लांब, अंगात– कत्था रंगाचा कुर्ता व लाल पायजामा घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात. **शौर्यदीप वर्णन** –रंग–गोरा, चेहरा–गोल, बांधा– सडपातळ, उंची– २ फुट, केस– भुरे व पातळ, अंगात– निळ्या रंगाचा टि–शर्ट व काळ्या रंगाचा पॅन्ट घातलेला आहे.

**२) पोलीस ठाणे अंबाझरी:–** कु. कशीश आनंद यादव, वय २० वर्षे, रा. नागोबा मंदीरजवळ, अंबाझरी बायपास, अंबाझरी नागपूर ही दिनांक ०९.०७.२०२६ चे १६.१५ वा. पासुन पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीतील, राहते घरून मंदीरी दक्षिणदास हॉस्पीटल,धरमपेठ येथे कामाला जाते असे सांगून कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग– गोरा, चेहरा– लांबट, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट १ इंच, केस– काळे लांब, अंगात– क्रिम रंगाची फुलाची प्रिन्टेड कुर्ती व लॅगीन घातलेले आहे. भाषा– मराठी/हिंदी बोलते.

**३) पोलीस ठाणे कपिलनगर :–** श्रीमती पुजा रोशन यादव, वय २७ वर्षे, रा. पिवळी नदी भन्ते आनंद कौशल्यायन नगर, गल्ली नं. ०३, कपिलनगर, नागपूर ह्या दिनांक २५.०६.२०२६ रोजी पासून पोलीस ठाणे कपिलनगर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** –रंग– सावळा, चेहरा– लांबट, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट, केस– काळे लांब, भाषा– हिंदी बोलतात. अंगात– क्रिम रंगाचा सलवार सुट व लाल रंगाचा दुपट्टा, घतलेला आहे. ओळख– डाव्या गालावर मस्सा आहें.



सौ. वैष्णवी व शौर्यदीप



कु. कशीश



श्रीमती पुजा

(ईतर)

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १५ वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३००९५२ /२००६ | कलम ३७९, ३४ भा.दं.वि. | १) मोहम्मद अनिस मोहम्मद जमील वय ३५ वर्ष रा. भवानी नगर, बागडेचे घरी किरायाने, पोलीस ठाणे कळमणा, नागपुर २) सुभाष महादेवरावजी मेश्राम वय ४० वर्ष रा. भोलेनगर, भांडेवाडी, साधु मेश्रामच्या घरी किरायाने, पृथ्वी सायकल स्टोअर्स, कळमणा, नागपूर. | २२.०७.२०२६ |
| २. | मा. जिल्हा न्यायाधीश —१९ तथा अति. सत्र न्यायाधीश नागपुर. | १५/ २०२६ | कलम ३६३, ३६६ भा.दं.वि. | शितल सोनियल नाईक वय २१ वर्षे, रा. वारीसपुरा, कामठी, जि. नागपूर. | १३.०७.२०२६ |
| ३. | मा. १७वे सहदिवाणी न्यायाधीश क स्तर व प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब नागपुर. | ३००५२४ /२०११ | कलम २९४, ५०६(ब) ३२३ भा.दं.वि. | अतीश उर्फ सोनु ए. गजभिये, वय २२ वर्ष, रा. चंद्रमणी चौक आंबेडकर नगर, वाडी, नागपूर. | १३.०७.२०२६ |

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**